# टाकळी येथे रामदास स्वामींनी स्वहस्ते लिहिलेल्या वाङ्‌मयाचे डिजीटलायझेशन

नाशिक:- समर्थ रामदास स्वामींनी १६२० ते १६३३ मधील नाशिकच्या टाकळी येथील वास्तव्यात लिहिलेल्या जवळपास ३५०० पृष्ठामधील ओवीचे, अभंगाचे, पदांचे ह्या अभंग पदरुपी अलौकिक ठेवीचे धुळ्याच्या समर्थ वागदेवता मंदिर येथे समर्थ भक्त नानासाहेब देव यांनी जतन करुन ठेवले होते.



समर्थ रामदास स्वामींनी जवळपास अकराशे मारुती मंदिरे संपुर्ण भारतात स्थापन केलेली होती. महाराष्ट्रातील समर्थ रामदास स्वामींच्या विविध मठांमध्ये जे जे वाङ्‌मय होते ते १९०५ मध्ये स्वखर्चाने भ्रंमती करुन नानासाहेब देवांनी धुळे येथे जतन करुन ठेवले होते. ४३ वर्षाच्या न्यायालयीन लढाईनंतर टाकळी येथे न्यायालयाच्या आदेशाने न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली पहिले पंचवार्षिक विश्वस्त मंडळ स्थापन झाले. त्या अनुषंगाने धुळे येथील समर्थ वागदेवता मंदिराचे आताचे अध्यक्ष शरद कुबेर व कार्याध्यक्ष डोंगरे यांनी समर्थ रामदास स्वामींच्या टाकळीच्या संदर्भातील १ ते ५० बागांमधील सर्व लेखन साहित्य आधुनिक युगानुसार डिझीटलायझेशन करुन १७ सीडीमध्ये तयार केले व १७ सीडींचा संच आज रोजी टाकळी देवस्थानचे विद्यमान अध्यक्ष एन.के.ब्रम्हे(अतिरिक्त सत्र न्यायाधीश) यांचेकडे विद्यमान विश्वस्त ज्योती खैरनार , सुधीर शिरवाडकर, प्रकाश पवार यांच्या उपस्थितीत सुपूर्त केला.